**<u>ठळक बातम्या</u>**

- विविध केंद्रीय संस्थांनी राज्यांमध्ये समन्वयानं काम करणं गरजेचं असून, घटनात्मक प्रमुख या नात्यानं राज्यपालांनी ही प्रक्रिया सुलभ करायला हवी असं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचं प्रतिपादन

- छत्रपती संभाजीनगर आणि धाराशिव जिल्हा नामांतर प्रकरणात हस्तक्षेप करायला सर्वोच्च न्यायालयाचा नकार

- वस्तू आणि सेवा कर संकलनामध्ये गेल्या महिन्यात १० टक्क्यापेक्षा जास्त वाढ

**आणि**

- जोरदार पावसामुळे राज्यात अनेक ठिकाणच्या नद्यांच्या पातळीत वाढ

**<><><><><>**

लोकशाहीच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी विविध केंद्रीय संस्थांनी राज्यांमध्ये समन्वयानं काम करणं गरजेचं असून, घटनात्मक प्रमुख या नात्यानं राज्यपालांनी ही प्रक्रिया सुलभ करायला हवी असं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी म्हटलं आहे. नवी दिल्ली मध्ये राष्ट्रपती भवन इथं आयोजित राज्यपालांच्या दोन दिवसीय परिषदेचं उदघाटन राष्ट्रपती मुर्मू यांच्या हस्ते आज झालं. त्यावेळी त्या बोलत होत्या. या परिषदेत केंद्र-राज्य संबंधांसह सर्वसामान्य नागरिकांच्या कल्याणाशी निगडित विविध मुद्द्यांवर चर्चा होणार आहे.

या दोन दिवसीय परिषदेत तीन फौजदारी कायद्यांची अंमलबजावणी, उच्च

शिक्षणात सुधारणा आणि विद्यापीठांची मान्यता, आदिवासी क्षेत्र, आकांक्षी जिल्हे आणि ब्लॉक्स, सीमावर्ती भाग यासारख्या केंद्रित क्षेत्रांचा विकास याविषयावर विचारविनिमय होणार आहे. त्याचप्रमाणे 'मायभारत', 'एक भारत श्रेष्ठ भारत' आणि 'एक पेड माँ के नाम' तसंच नैसर्गिक शेती या मोहिमांमध्ये राज्यपालांची भूमिका; राज्यातल्या विविध केंद्रीय संस्थांमध्ये उत्तम समन्वय साधण्यात राज्यपालांचं योगदान या मुद्द्यांचा समावेश आहे.

या परिषदेला उपराष्ट्रपती, प्रधानमंत्री यांच्यासह केंद्रीय मंत्री, नीती आयोगाचे उपाध्यक्ष, मुख्य कार्यकारी अधिकारी आणि मंत्रालयातले वरिष्ठ अधिकारी देखील उपस्थित आहेत.

**<><><><><>**

छत्रपती संभाजीनगर आणि धाराशिव या जिल्ह्यांच्या नामांतराला आव्हान देणारी याचिका आज सर्वोच्च न्यायालयानं फेटाळली. नाव देण्याचा आणि बदलण्याचा अधिकार कायद्यानं राज्य सरकारला दिलेला आहे असं निरीक्षण नोंदवत सर्वोच्च न्यायालयानं नामांतर प्रकरणात हस्तक्षेप करायला नकार दिला.

जिल्ह्याचं नाव बदलायचं असेल, तर सूचना आणि हरकती मागवल्या जातात. मात्र औरंगाबाद नामांतराच्या वेळी असं घडलं नसल्याचा युक्तिवाद याचिकाकर्त्यांनी केला होता. मात्र, या प्रकरणी न्यायालयीन पुनरावलोकन करण्याची गरज नसल्याचं सांगून सर्वोच्च न्यायालयानं हि याचिका फेटाळली.

**<><><><><>**

कृषीक्षेत्राचा विकास आणि शेतकऱ्यांच्या कल्याणाकरता केंद्रसरकार वचनबद्ध आहे, असं केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंग चौहान यांनी आज राज्यसभेत सांगितलं. केंद्र सरकारनं यंदाच्या अर्थसंकल्पात कृषिक्षेत्रासाठी एक लाख ३२ हजार कोटी

रुपयांहून अधिक तरतूद केली असून २०१३-१४ च्या तुलनेत ती २७ हजार कोटी रुपयांनी अधिक आहे, असं ते म्हणाले. केंद्र सरकार सिंचनावर लक्ष केंद्रित करत असल्यानं वर्ष २०२३-२४ मध्ये देशात ३२९ दशलक्ष टन इतक्या विक्रमी अन्नधान्याचं उत्पादन झालं, अशी माहिती त्यांनी दिली.

खोट्या बातम्या आणि दिशाभूल करणारी माहिती ही समाजातली अपप्रवृत्ती असून तिला वेळीच आळा घालणं अत्यावश्यक आहे, असं केंद्रीय माहिती आणि प्रसारण राज्यमंत्री डॉ एल मुरुगन यांनी सांगितलं. या संदर्भातल्या पुरवणी प्रश्नाला उत्तर देताना ते बोलत होते.

**<><><><><>**

मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षानं राज्यातल्या हजारो रुग्णांचे प्राण वाचवले असून या योजने अंतर्गत गेल्या २ वर्षं १ महिन्याच्या काळात रुग्णांना ३०१ कोटी रुपये अर्थसहाय्य वितरित करण्यात आल्याचं मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षानं जारी केलेल्या निवेदनात म्हटलं आहे.

मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्षाच्या मुंबईतल्या कार्यालयातून आतापर्यंत २७४ कोटींपेक्षा जास्त, तर नागपूर कार्यालयातून २७ कोटी रुपयांचं अर्थसहाय्य देण्यात आलं. या माध्यमातून राज्यातल्या ३६ हजार १८२ गंभीर आजारी रुग्णांचे प्राण वाचल्याचं यात म्हटलं आहे.

या योजनेची संपूर्ण प्रक्रिया ऑनलाईन असून, दुर्धर आजारानं पीडित रुग्णांनी त्याचा लाभ घ्यावा असं आवाहन या मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्ष प्रमुखांनी केलं आहे.

**<><><><><>**

मुंबईतल्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांच्या मंडपांसाठीची परवानगी पत्रे ६

ऑगस्टपासून दिली जाणार आहेत. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या प्रसिद्धी पत्रकात ही माहिती देण्यात आली असून गणेश मंडळे महानगनपालिकेच्या यासाठी तयार करण्यात आलेल्या पोर्टवर जाऊन त्याची प्रक्रिया पूर्ण करु शकतील. ज्या मंडळांनी गेल्या दहा वर्षात परवानगीच्या सर्व प्रक्रिया पूर्ण केल्या आहेत. त्यांना पुढील ५ वर्षांसाठी परवानगी देण्यात येणार असल्याची माहिती महानगरपालिकेनं प्रसिद्धीला दिलेल्या पत्रकात दिली आहे. त्यांना दरवर्षी त्यांच्या परवान्याचं नुतनीकरण करावं लागणार आहे. ७ सप्टेंबर पासून गणेशोत्सव सुरु होत आहे. यंदा पर्यावरणपूरक गणेशोत्सवावर भर देण्यात आला असून महानगरपालिकेनं ५०० टन शाडूची माती पूरवली आहे.

<><><><><>

जीएसटी अर्थात वस्तू आणि सेवा कर महसूल संकलनामध्ये गेल्या महिन्यात १० पूर्णांक तीन दशांश टक्क्यांनी वाढ होऊन ते एक लाख ८२ हजार कोटी रुपयांवर पोहोचलं आहे. करदात्यांचे परतावे दिल्यानंतर वस्तू आणि सेवाकराचं निव्वळ संकलन एक लाख ६० हजार कोटी रुपये इतकं आहे, जे १४ पूर्णांक ४ दशांश टक्क्यांनी वाढलं आहे. वित्त मंत्रालयानं प्रसिद्ध केलेल्या आकडेवारीनुसार एकूण परताव्यांमध्ये १६ हजार २८३ कोटी रुपयांची घट झाली असून हे प्रमाण १९ पूर्णांक ४ दशांश टक्के इतकं आहे. देशांतर्गत व्यवहारांमध्ये वाढ हे वस्तू आणि सेवाकर महसूल संकलनातलया वृद्धीचं मुख्य कारण आहे. याच काळात आयाती मधून मिळालेल्या महसुलात १४ पूर्णांक २ दशांश टक्के वाढ झाली असून ते ४८ हजार ३९ कोटी रुपये झालं आहे.

<><><><><>

राज्यात काही ठिकाणी होत असलेल्या जोरदार पावसामुळे अनेक ठिकाणच्या नद्या आणि तलाव भरून वाहत आहेत.

**सांगली** जिल्ह्यात कृष्णा आणि वारणा नदीच्या पाणलोट क्षेत्रात पाऊस पडत असल्यानं वारणा आणि कोयना धरणातून नदीपात्रात विसर्ग करण्यात येत आहे. त्यामुळे जिल्ह्यातल्या ५ हजारहून अधिक जणांना पशुधनासह सुरक्षित ठिकाणी हलवण्यात आलं आहे. सांगलीत आयर्विन पुल आणि मिरज या दोन्ही ठिकाणी कृष्णा नदी इशारा पातळीवरून वाहत आहे. नागरिकांनी घाबरून न जाता सतर्क राहावं असं प्रशासनानं आवाहन केल आहे.

**गोंदिया** जिल्ह्यात झालेल्या जोरदार पावसामुळे मोरगाव अर्जूनी तालुक्यातल्या नवेगाव बांध ते गोठनगाव या मार्गाच्या नाल्यावरचे पूल कोसळल्यानं जवळपास १० गावांचा संपर्क तुटला आहे.

**अकोला** जिल्ह्यातल्या काटेपूर्णा धरणाचा जलसाठा काल ८० टक्क्यांवर पोहोचल्यानं धरणाची चार दारं अंशतः उघडण्यात आली असून त्यातून नदीपात्रात प्रतिसेकंद ९२ घनमीटर पाण्याचा विसर्ग करण्यात येत आहे.

**<><><><><>**

पॅरिस ऑलिम्पिकमध्ये भारताचा आजचा दिवस सकारात्मक पद्धतीनं सुरू झाला. तिरंदाजीत अंकिता भकत आणि धीरज बोम्मदेवरा यांनी मिश्र प्रकारात इंडोनेशियाच्या जोडीचा ५-१ असा पराभव करून उपांत्यपूर्व फेरीत जागा मिळवली. यंदा दोन कास्यपदकांवर नाव कोरणारी नेमबाज मनू भाकर २५ मीटर पिस्टल प्रकारात पुढच्या फेरीत दाखल झाली. याशिवाय आज नौकानयनात विष्णू सर्वनन आणि नेत्रा कुमारन, तसंच गोल्फमध्ये शुभंकर शर्मा आणि गगनजीत भुल्लर मैदानात उतरणार आहेत. हॉकी स्पर्धेत आज भारतासमोर ऑस्ट्रेलियाचं आव्हान

असेल. तर बॅडमिंटनमध्ये पुरुष एकेरीच्या उपांत्यपूर्व फेरीत लक्ष्य सेन लढत देईल. याशिवाय महिलांची ५ हजार मीटर आणि पुरुषांच्या गोळाफेक स्पर्धाही आज होणार आहेत.

**<><><><><>**

पॅरिस ऑलिंपिक्समध्ये कांस्य पदक पटकावल्याबद्दल मध्य रेल्वेनं स्वप्निल कुसळे याला बढती दिली आहे. पुणे विभागात तिकीट तपासणीस म्हणून कार्यरत असलेल्या स्वप्निलची बढती आता राजपत्रित अधिकाऱ्यांच्या गट ब श्रेणीमध्ये करण्यात आली आहे. मध्य रेल्वेच्या महाव्यवस्थापकांनी काल ही घोषणा केली.

**<><><><><>**

आज सकाळच्या सत्रात शेअर बाजारात घसरण पाहायला मिळाली. मुंबई शेअर बाजाराचा सेन्सेक्स ६४० अंकांनी घसरून ८१ हजार २२७वर आला. तर राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टी काल २५ हजारांचा उच्चांक गाठल्यानंतर आज ५० अंकांनी घसरत २४ हजार ७४०वर आला. कच्च्या तेलाच्या किमती वाढल्यामुळे अमेरिकन डॉलरच्या तुलनेत रुपया ८३ रुपये ७३ पैशांवर आला आहे. काही वेळापूर्वी सेन्सेक्स सुमारे एक हजार अंकांनी, तर निफ्टी सुमारे ३०० अंकानी खाली आला होता.

**<><><><><>**

भंडारा जिल्ह्यातल्या पुनर्वसित सालेबर्डी या गावातल्या शाळेला अजूनही प्रशासकीय मान्यता मिळाली नसल्यानं या शाळेतली मुलं शासनाच्या पोषण आहार, गणवेश या सारख्या लाभापासून वंचित आहेत. त्यामुळे केवळ आश्वासनं न देता सरकारनं या शाळेला मान्यता देऊन विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची सोय कारवी तसंच

त्यांना सर्व सरकारी योजनांचा लाभ मिळवून द्यावा अशी मागणी गावकऱ्यांनी केली आहे.

**//<><><><><>//**